# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२५/सूचना क्र.०३/प्र.क्र.०११/कृषी/केंप्रप्र/२४४६, दि. २४ जुलै, २०२५

## <u>जाहीर सूचना</u>

**विषय : (१) कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता इ. १२ वी (विज्ञान) मधील खुल्या वर्गासाठी किमान ५० टक्के गुणांची अट शिथील करून किमान ४५ टक्के असल्याबाबत.**

**(२) केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाकडील (CBSE) इ. १२ वी (विज्ञान) अभ्यासक्रमामधील 'कृषि (८०८)' हया विषयाचा पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता १० पॉईटसचा अधिभार देण्याबाबत.**

संदर्भ : महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, अधिसूचना दिनांक २३ जुलै, २०२५.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व संलग्न हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.४/७/२०२५ पासून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे राबविण्यात येत आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये मुद्दा क्र.२.१ अंतर्गत क्र. २ येथे 'अर्हता परीक्षा (इ. १२ वी विज्ञान) खुल्या उमेदवारास ५० टक्क्यांपेक्षा कमी आणि आरक्षित प्रवर्गाच्या (अ.जा. / अ.ज./ वि.जा./ भ.ज.(ब) / भ.ज.(क) / भ.ज.(ड) / इमाव / विमाप्र / सा. व शै.मा.व. / आ.दु.घ./ दिव्यांग [अपंग] / अनाथ) उमेदवारास ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण नसावे. याचबरोबर सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये किमान गुण ० पेक्षा जास्त असावेत.' अशी पात्रता असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ६ येथे कृषी व संलग्न अभ्यासक्रमातील विविध आठ विद्याशाखांच्या [बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एससी. (ऑनर्स) (वनशास्त्र), बी. टेक् (कृषी अभियांत्रिकी), बी.टेक. (अन्नशास्त्र), बी.एस्सी. (ऑनर्स) (सामुदायिक विज्ञान), बी. टेक, (जैव तंत्रज्ञान), बी. एससी (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन)] प्रवेशाकरिता काही व्यावसायिक / ऐच्छिक / पदविकासह उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (१०) + २ परीक्षा पध्दती) उत्तीर्ण उमेदवारांना १० पॉईंटसचा अधिभार देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे.

तथापि, शासनाच्या दिनांक २३/०७/२०२५ रोजीच्या संदर्भीय अधिसूचनेद्वारे कृषी विद्यापीठांतर्गत कृषी व संलग्न पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता इ. १२ वी (विज्ञान) मधील खुल्या वर्गासाठी किमान ५० टक्के गुणांची अट शिथील करून किमान ४५ टक्के करण्यात आलेली आहे. याच बरोबर 'कृषि (८०८)' हया विषयासह केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाकडील (CBSE) इ.१२ वी (विज्ञान) उत्तीर्ण उमेदवारांना उक्त नमूद

करण्यात आलेल्या आठ विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता १० पॉईंटसचा अधिभार देण्यात आलेला आहे.

सर्व प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व इतर संबंधितांनी याची नोंद घ्यावी. ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२७ जुलै, २०२५ असल्याने नव्याने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी सदर मुदतीत https://cetcell.mahacet.org/cap-2025-26/ हया लिंकद्वारे ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावेत.

**सही/-**
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**